**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मोठया आकारमानाची शेततळी ग्रामपंचायतीमार्फत घेण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग (रोहयो)
शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१५/प्र.क्र.८५/रोहयो-१
नवीन प्रशासन भवन ,१६ वा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १३ जुलै, २०१६

**वाचा :-**

१. शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो), क्र.मग्रारो-२०१४ / प्र.क्र.१६ / मग्रारो-१, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४

२. शासन निर्णय, नियोजन विभाग (रोहयो), समक्रमांक, दिनांक १४ सप्टेंबर, २०१५

**प्रस्तावना :-**

शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनाची सोय भविष्यात उपलब्ध होण्याच्या दृष्टिने तसेच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व मजुरांना रोजगार पुरविण्याकरिता, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ च्या शासन निर्णयामध्ये निर्धारित करण्यात आलेल्या शेततळयांच्या नऊ आकारमानांपैकी ग्रामपंचायतीमार्फत छोट्या आकारमानाची ( १०X १० X ३ मी., १५ X १० X ३ मी. व १५ X १५ X ३ मी.) शेततळी व यंत्रणांमार्फत विहित आकारमानांची शेततळी घेण्यासंदर्भात शासन निर्णय दिनांक १४ सप्टेबर, २०१५ निर्गमित करण्यात आलेला आहे.

ग्रामपंचायतींमार्फत देखील मोठ्या आकारमानाची शेततळे घेण्याचे अनुज्ञेय करण्याबाबत शासनस्तरावर होत असलेली मागणी विचारात घेऊन, शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. शासन निर्णय दिनांक २८ फेब्रुवारी, २०१४ अन्वये निर्धारित करण्यात आलेली सर्व विहित आकारमानाची ( १० X १० X ३ मी., १५ X १० X ३ मी., १५ X १५ X ३ मी., २० X १५ X ३ मी., २० X २० X ३ मी., २५ X २० X ३ मी., २५ X २५ X ३ मी., ३० X २५ X ३ मी., ३० X ३० X ३ मी.) शेततळे ग्रामपंचायतीमार्फत घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त सर्व विहित आकारमानाची शेततळी घेताना ग्रामपंचायतीने राज्य शासनाचा कृषि विभाग अथवा लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद यांची तांत्रिक मंजूरी घ्यावी.

३. शासन निर्णय दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ अन्वये विहित करण्यात आलेल्या इतर अटी व शर्ती आहेत त्याचप्रमाणे लागू राहतील. त्यामध्ये अन्य कोणताही बदल नाही.

२.    सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१६०७१३११०३१७८९१६ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(वि.मु.काळे)**
**अवर सचिव (रोहयो),महाराष्ट्र शासन**

प्रत :-

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई -३२
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई -३२
४) सर्व सन्माननीय विधानसभा / विधानपरिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य
५) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
६) मा. मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई -३२
७) सर्व विभागीय आयुक्त
८) आयुक्त, महात्मा गांधी नरेगा आयुक्तालय, नागपूर
९) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई -३२ (प्रसिध्दिकरिता)
११) जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व
१२) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर
१३) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१४) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे
१५) संचालक, फलोत्पादन, पुणे
१६) संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे
१७) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
१८) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१९) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर
२०) सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) सर्व
२१) सर्व उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय.
२२) सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२३) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
२४) मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे, (स्थानिक स्तर) विभाग पुणे
२५) कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (महाऑनलाईनवर प्रसिध्दीसाठी)
२६) सारसंग्रह रोहयो – १ / निवडनस्ती (रोहयो-१)